सन २०१७-१८ या वर्षातील आयईसी (माहिती, शिक्षण व संपर्क) प्रसिध्दी व जनजागृती उपक्रमांची अंमलबजावणी करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## सार्वजनिक आरोग्य विभाग
## शासन निर्णय, क्रमांकः आयईसी २०१८/प्र.क्र.१४/आरोग्य ३

१० वा मजला, संकुल इमारत,
जी.टी. रुग्णालय आवार, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १२ फेब्रुवारी, २०१८.

वाचा :

१) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.११/आरोग्य-३ दिनांक ३०.०१.२०१७.
२) सार्वजनिक आरोग्य विभाग, शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.२४/आरोग्य-३ दिनांक २२.०३.२०१७.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. मावज २०१७/प्र.क्र.१५३/का.३४, दि.२१.०७.२०१७
४) सार्वजनिक आरोग्य, विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.३१/आरोग्य-३ दिनांक २८.०८.२०१७.
५) सार्वजनिक आरोग्य ,विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.३२/आरोग्य-३ दिनांक २८.०८.२०१७.
६) सार्वजनिक आरोग्य, विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.१४६/आरोग्य-३ दिनांक २८.०८.२०१७.
७) सार्वजनिक आरोग्य, विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.१८५/आरोग्य-३ दिनांक २८.०८.२०१७.
८) सार्वजनिक आरोग्य, विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.१५४/आरोग्य-३ दिनांक १४.०८.२०१७.
९) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.२५१/आरोग्य-३ दिनांक ३०.११.२०१७.
१०) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.२५२/आरोग्य-३ दिनांक ३०.११.२०१७.
११) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.२५३/आरोग्य-३ दिनांक ३०.११.२०१७.

१२) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.२५६/आरोग्य-३ दिनांक २१.१२.२०१७.

१३) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.२५५/आरोग्य-३ दिनांक २१.१२.२०१७.

१४) सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्र. आयईसी२०१७/प्र.क्र.२९४/आरोग्य-३ दिनांक ३०.१२.२०१७.

**प्रस्तावना :**

सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय, दि. ५ जानेवारी, २०१७ व दिनांक २१ जुलै,२०१७ नुसार शासकीय जाहिरात वितरण धोरणाची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार विभागामार्फत सन २०१७-१८ या वर्षात मान्यता देण्यात आलेल्या जनजागगृती व प्रसिध्दी उपक्रमांबाबतच्या वरील अ.क्र. ८ ते १२ येथील शासन निर्णयास अ. क्र.१३ येथील शासन निर्णयान्वये स्थगिती देण्यात आली होती. तथापि, सदर जाहिरात वितरण विषयक धोरणाचा शासन निर्णय निर्गमीत होण्यापुर्वी सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षाकरीता आरोग्य शिक्षण व संपर्क विभागाचा प्रकल्प आराखडा केंद्र शासनाने मंजूर केलेला असल्याने सदर स्थगिती रद्द करुन सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षात केंद्र शासनाच्या मान्यतेने तयार करण्यात आलेल्या Media Plan ला मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

आता या शासन निर्णयान्वये विभागामार्फत राबविण्यात येणा-या जनजागगृती व प्रसिध्दी उपक्रमांबाबत खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. उपरोक्त संदर्भ क्र.१४ येथील शासन निर्णयान्वये विभागामार्फत राबविण्यात येणा-या जनजागगृती व प्रसिध्दी उपक्रमांबाबतच्या शासन निर्णयास देण्यात आलेली स्थगिती रद्द करण्यात येत आहे. तसेच सन २०१७ -१८ या आर्थिक वर्षामधील माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) कार्यक्रमांतर्गत केंद्र शासनाच्या मान्यतेने तयार करण्यात आलेल्या प्रकल्प आराखडयातील Media Plan ला मंजूरी देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भ क्र.१ ते ११ येथील शासन निर्णयांमधील ज्या उपक्रमांबाबत कार्यवाही पुर्ण झाली आहे त्याबाबीस कार्योत्तर मंजूरी देण्यात येत आहे.

३. राज्य शासन अनुदानातून संदर्भ क्र.८ येथील शासन निर्णयान्वये आरोग्य विषयक संदेशाचे प्रदर्शन संच व मॉडेल तयार करणे संदर्भात राबविण्यात आलेल्या प्रक्रियेस मान्यता देण्यात येत आहे.

४. दि.२१ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयामधील तरतुदीनुसार राज्याच्या सर्व शासकीय आणि निमशासकीय संस्थांसाठी माध्यम आराखडयाचे नियोजन व अंमलबजावणी यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या समितीवर विभागाचे जाहिरात विभाग प्रमुख म्हणून सहसचिव/उपसचिव (रुग्णसेवा), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

२. **अटी व शर्ती:**

१. माहिती प्रसारणसाठी तयार करण्यात आलेले आर्टवर्क/टिव्हीसी/क्रिएटिव्ह जिंगल्स आदी साहित्य महासंचालनालयाच्या मान्यतेनंतर प्रस्तृत करण्यात यावे

२. दुरचित्रवाणी, रेडीओ, वृत्तपत्रे, जाहिरात फलक, एसटी बस पॅनल तसेच एसटी बसमधील सीटबॅक, एसटी स्टँड होर्डीग, प्रवासी रिक्षा पॅनल, रेल्वे डिस्प्ले, एसएमएसव्दारे संदेश, सिनेमागृहात प्रसिध्दी, पीव्हीसी बॅनर्स फ्लेक्स यावरील खर्च शासन मान्य दरानुसार करण्यात यावे. यासंबंधीचे कार्यादेश माहिती व जनसंपर्क महासंचालनामार्फत दिले जातील.

३. घडीपत्रिका, पोस्टर्स, इतर साहित्य यावरील खर्च उपसंचालक, आरोग्यसेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग,पुणे यांनी विहित पध्दतीने करावे.

४. यापुढील सर्व माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) प्रस्तावांना DGIPR ची ची मान्यता घ्यावी

५. यापुढील सर्व माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) कार्यक्रमांबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग,क्र.मावज २०१७/प्र. क्र.१५३/का.३४, दि.२१.०७.२०१७ नुसार कार्यवाही करण्यात यावी.

६. माहिती, शिक्षण व संपर्क (IEC) बाबतचे उर्वरीत प्रशासकीय मान्यतेचे प्रस्ताव आयुक्त, आरोग्य सेवा व अभियान संचालक यांनी शासनाच्या मान्यतेसाठी सत्वर सादर करावेत.

३. सदर शासन निर्णय माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांचे मान्यतेने निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१२१००३५०४६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.02.12 17:10:26 +05'30'

**( रो.दि.कदम-पाटील )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. महालेखापाल, महाराष्ट्र- १/ २ (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
२. आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
३. आयुक्त,राज्य कामगार विमा योजना, वरळी, मुंबई.
४. मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, परेल, मुंबई.
५. प्रकल्प संचालक, महाराष्ट्र राज्य एडस् नियंत्रण संस्था,वडाळा, मुंबई.
६. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
७. संचालक, आरोग्य सेवा, मुंबई.
८. सहसंचालक, (अर्थ व प्रशासन) आरोग्य सेवा, मुंबई.
९. उप संचालक, आरोग्य सेवा राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे.
१०. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
११. वित्त विभाग (कोषागारे/प्रशासन५) मंत्रालय, मुंबई.
१२. कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३. निवडनस्ती (आरोग्य-३).